॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

EXAMINATION (CONVOCATION) SECTION

Phone: (02462) 229242
Fax No. (02462) 229250
Website: www.srtmun.ac.in
E-mail: directorboee@gmail.com

जा क्र./परीक्षा/दीक्षांत/२०१९–२०/4865 दिनांक: २६.०७.२०१९

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
मा. संचालक, सर्व संकुले
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : पदवी आवेदनपत्र महाविद्यालयात स्वीकारणे बाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी कळविण्यांत येते की, प्रस्तुत विद्यापीठाचा **बावीसावा (२२)** दीक्षांत समारंभ साधारणत: सप्टेंबर २०१९ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत नमुन्यातील पदवी आवेदनपत्र दिनांक १६/०८/२०१९ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानुसार पदवी आवेदनपत्र परिपूर्ण असल्याची खात्री करुनच विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र स्वीकारावेत.

पदवी आवेदनपत्र स्विकारण्याच्या विहीत मुदतीनंतर दिलेल्या तारखेनुसार विद्यार्थ्यांकडून स्वीकारलेली पदवी आवेदनपत्रे व शुल्क दीक्षांत कक्ष/उपकेंद्र परभणी/उपकेंद्र,लातूर येथे सादर करणेबाबतची सूचना सोबत जोडली आहे त्याप्रमाणेच पदवी आवेदनपत्र सादर करावेत. तसेच सदर सूचनापत्र विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयनी सूचना फलकावर लावावे. हि विंनती

आपला,

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION (CONVOCATION) SECTION

Phone: (02462) 229242
Fax No. (02462) 229250
Website: www.srtmun.ac.in
E-mail: directorboee@gmail.com

जा क्र./परीक्षा/दीक्षांत/२०१९–२०/4866 दिनांक : २६.०७.२०१९

## दीक्षांत आवेनदपत्र सादर करणे बाबत सूचना

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा **बावीसावा** दीक्षांत समारंभ साधारणत: सप्टेंबर २०१९ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. समारंभाचा दिनांक व वेळेबाबत सूचना वृत्तपत्रांमधून व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात येईल.

**फक्त हिवाळी – २०१८ व उन्हाळी–२०१९** मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दिनांक १६/०८/२०१९ पर्यंत संबंधीत महाविद्यालयात पदवी आवेदनपत्र सादर करता येतील. ज्या विद्यार्थ्यांना टपालद्वारे पदवी प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावयाचे असल्यास तसे आवेदन पत्रात नुमद करावे व आपला पत्ता अचूक भरण्याची काळजी घ्यावी.

**०१.आवेदनपत्राची उपलब्धता** : पदवी आवेदनपत्र विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यावरुन डाऊनलोड केलेल्या आवेदनपत्रासाठी विहीत शुल्काव्यतिरिक्त **रु.१०/–** अतिरीक्त भरावे लागेल.

**०२. पदवी प्रमाणपत्र शुल्क :**

(अ) पदवी प्रमाणपत्र साठी **रु.१७०/–**(पदवी प्रमाणपत्र शुल्क–रु.१५० व नोंदणी शुल्क–रु.२०)

(ब) टपालाने पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी **रु.२२०/–** (पदवी प्रमाणपत्र शुल्क–रु.२०० व नोंदणी शुल्क–रु.२०)

**०३. महाविद्यालयांनी आवेदनपत्र दाखल करण्याचा दिनांक :**

अ) महाविद्यालयांनी **हिवाळी – २०१८ व उन्हाळी–२०१९** परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी आवेदनपत्र भरुन घेतलेले असतील त्यांनी केवळ उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचेच परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठात/उपकेंद्र येथे सर्व वर्षाच्या गुणपत्रकांची साक्षांकित छायांकित प्रत सह सादर करावेत.

ब) वरील प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांचे पदवी आवेदनपत्र दिनांक १६/०८/२०१९ पर्यंत संबंधीत महाविद्यालयात स्विकारावीत. या सर्व अर्जाचे शुल्क D.D. (Demand Draft) दि. १९/०८/२०१९ रोजी काढावा.

क) जे विद्यार्थी १६/०८/२०१९ पर्यंत पदवी आवेदनपत्र सादर करु शकले नाहीत त्यांनी पदवी आवेदनपत्र संबंधीत महाविद्यालयात दिनांक १७/०८/२०१९ ते २४/०८/२०१९ पर्यंत **विलंब शुल्क रु.५० सह** सादर करावेत.अशा विलंब आवेदनपत्राचे शुल्क D.D. (Demand Draft ) दि. २६/०८/२०१९ रोजी काढण्यात यावा.

सर्व महाविद्यालयाने वरील **अ,ब व क** प्रमाणे घेतलेले पदवी आवेदनपत्र खालील दिनांक व ठिकाणी सादर करावेत.

| अ.क्र | जिल्हा | दिनांक | अर्ज जमा करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | नांदेड | २८/०८/२०१९ | दीक्षांत कक्ष,प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड |
| २ | परभणी | २८/०८/२०१९ | विद्यापीठ, उपकेंद्र परिसर, परभणी |
| ३ | हिंगोली | २८/०८/२०१९ | विद्यापीठ, उपकेंद्र परिसर, परभणी |
| ४ | लातूर | २८/०८/२०१९ | विद्यापीठ, उपकेंद्र परिसर, लातूर |

वरील प्रमाणे उपकेंद्र प्रमुखांनी सर्व आवेदनपत्र/D.D. (Demand Draft )/पावती दीक्षांत कक्षात दिनांक ३०/०८/२०१९ रोजी सादर करावीत.

सबब, वरील प्रमाणे नोंद घेऊन सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी/संकूल प्रमुखांनी ही बाब सर्व विद्यार्थ्यीं व संबंधीताच्या निदर्शनास आणुन द्यावी. कळावे

**संचालक**
**परीक्षा व मुल्यमापन मंडळ**

प्रत माहितीस्तव :

१. मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा. संचालक, परभणी,लातूर, उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.